Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 14 May 2025

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १४ मे २०२५ सकाळी ११.०० वाजता.**

****

देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून भूषण गवई यांना राष्ट्रपती भवनात झालेल्या विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी शपथ दिली. या शपथग्रहण समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपराष्ट्रपती जगदीश धनखर, लोकसभेचे सभापती ओमप्रकाश बिर्ला, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. गवई यांच्या मातोश्री देखील या सोहळ्यास उपस्थित होत्या. न्यायमूर्ती भूषण गवई पुढचे ६ महिने १० दिवस या पदावर कार्यरत राहतील.

****

अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याचा चीनचा प्रयत्न हास्यास्पद आहे, असे भारताने म्हटले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य आणि अविभाज्य भाग आहे आणि राहील. हे सत्य तेथील एखाद्या भागाचे नाव बदलण्याच्या हास्यास्पद प्रयत्नाने बदलू शकत नाही यावर त्यांनी भर दिला.

****

नैर्ऋत्य मोसमी पावसानं बंगालच्या उपसागरातला दक्षिण भाग व्यापला असून दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात तो पोहोचला आहे. पुढच्या ३-४ दिवसात मान्सून आणखी पुढं सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस, पडण्याची शक्यता हवामान विभागाने वरतवली आहे. राज्यात काल अनेक ठिकाणी पाऊस झाला. छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात पहाटे पावसाच्या सरी कोसळल्या.

सांगली जिल्ह्यातील वाळवा, मिरज, तासगाव, खानापूर, पलूस, जत आणि कवठेमहांकाळ तालुक्यात रात्री उशिरापर्यंत मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला.

****

भारतात कार्यरत पाकिस्तानी कर्मचाऱ्यांना २४ तासांच्या आत भारत सोडण्याचे आदेश परराष्ट्र मंत्रालयाने दिले आहेत. नवी दिल्ली इथे पाकिस्तान उच्चायोगात कार्यरत एका पाकिस्तानी कर्मचाऱ्याने आपल्या पदाला साजेसं वर्तन न केल्यामुळे त्याला काढून टाकण्यात आलं आहे. यासंदर्भात पाकिस्तान उच्चायोगाच्या प्रभारींना या आशयाचं आक्षेप पत्र जारी करण्यात आलं आहे.

****

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात रेल्वे पुलांचे काम महारेलने हाती घेतले आहे. आतापर्यंत 32 पूल महारेलने पूर्ण केले आहेत. यावर्षी 25 पूल महारेलच्या माध्यमातून पूर्ण होणार आहेत. महाराष्ट्राला रेल्वे फाटक मुक्त करायचे आहे. त्या दृष्टीने महारेलकडे जबाबदारी दिली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेवलपमेंट कॉर्पोरेशन, महाराष्ट्र शासन आणि रेल्वे मंत्रालय यांचा संयुक्त उपक्रम असलेल्या रे रोड केबल स्टेड रोड ओवर ब्रिज व टिटवाळा रोड ओवर ब्रिजच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल बोलत होते.

****

दरम्यान, महाराष्ट्रात मेट्रोचं जाळं अधिक विस्तारीत करण्यासाठी तसंच नागरी क्षेत्रातील विविध प्रकल्पांच्या व्यापक अंमलबजावणीसाठी केंद्रीय नगरविकास मंत्रालयाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असं प्रतिपादन केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांनी केलं आहे. काल मुंबईत यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि सर्व संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

****

चीनच्या जियांगशान इथे सुरू असलेल्या आशियाई भारोत्तोलन चॅंपियनशिप या स्पर्धेतलं भारतीय भारोत्तोलक दिलबाग सिंग याचं आव्हान संपुष्टात आलं आहे. पुरुषांच्या ९६ किलो वजनगटात दिलबाग सिंग नवव्या स्थानावर पोहोचला होता. या आधी याच स्पर्धेत महिलांच्या ६४ किलो वजनगटात भारतीय भारोत्तोलक सीरम निरुपमा देवी एकून २०६ किलो वजन उचलून चौथ्या क्रमांकावर राहिल्यानं पदक

मिळऊ शकली नव्हती. आशियाई भारोत्तोलन स्पर्धेत भारताकडून दिलबाग सिंग आणि सीरम निरुपमा देवी हे दोनच खेळाडू सहभागी झाले होते.

****

अठ्ठ्याहत्तराव्या कान चित्रपट महोत्सवाला काल फ्रान्स इथं आकर्षक रेड कार्पेट आणि झगमगाटात प्रारंभ झाला. सुप्रसिद्ध अमेरिकी अभिनेते, निर्माता आणि दिग्दर्शक रॉबर्ट डी नीरो यांना काल मानद पाल्मे डी या सम्नानानं गौरवण्यात आलं. भारताचे महान चित्रपट निर्माते सत्यजीत रे यांचा १९७० साली प्रदर्शित झालेला अरण्येर दिन रात्री हा चित्रपट क्लासिक संवर्गात दाखवण्यात येईल, यात सौमित्र चॅटर्जी आणि शर्मिला टागोर यांच्या भूमिका आहेत. भारतीय चित्रपट दिद्गर्शक नीरज घायवान यांचा दुसरा चित्रपट होमबाऊंड ला अनसर्टन रिगार्ड या संवर्गासाठी निवडण्यात आलं असून या चित्रपटात इशान खट्टर यांनी भूमिका केलेल्या आहेत.

****